महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : दुसरी

---

# समजपूर्वक वाचन

**चिठ्ठी**

माझी मैत्रिण संगीता हिला,

चिठ्ठीचे कारण की तू मला गत्तीत्ती घे. मी काल तुझ्याशी भांडण केले. आता मी भांडणार नाही. शाळा सुटल्यावर माझ्या घरी खेळायला आहे. तुझे उत्तर चिठ्ठीने दे.

तुझी मैत्रिण,

अलका

**प्रश्न :-**

१. चिठ्ठी कोणी लिहिली आहे.?
२. चिठ्ठीकोणालालिहिली आहे.?
३. चिठ्ठीतून कशाची मागणी केली आहे.?
४. शाळा सुटल्यावर घरी कशासाठी बोलावले आहे.?
५. विचार करून लिही
   चिठ्ठीचे उत्तर चिठ्ठीने का मागितले असेल.?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्‌या परिषद)

इयत्ता : दुसरी

---

**सूचनाफलक**

**<u>चला वर्षासहलीला!</u>**

कधी निघायचे? - २० जुलै २०१५

कुठे जायचे? - विरोबाच्या टेकडीवर

किती वाजता जायचे? - सकाळी ८ वाजता

किती वाजता यायचे ? - १२ वाजता

कुठून निघायचे? - अर्थात शाळेतून

**सहलीला जाताना पुढील सामान आणावे.**

१ पिशवीत भाजीभाकरीचा डबा आणि पाण्याची बाटली.

२ डोक्यावर घालायला पावसाची टोपी किंवा प्लास्टिकची पिशवी.

३ भिजल्यावर डोके पुसायला कपडा.

**नवीन शब्द** :- वर्षा - पाऊस

**प्रश्न :-**

१ वर्षासहलीत काय करायचे असेल ?

२ सहल कुठे जाणार आहे ?

३ सहलीला जाताना कपडा का घ्यायचा आहे ?

४ सहलीला गेलेली मुले किती वेळाने परत येणार आहेत ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : दुसरी

---

**अनुभव**

संदर्भ :- आमच्या गोष्टी - मराठी पावरी

लेखिका :- वर्षा सहस्रबुद्धे

साप.......... साप! बापरे! भला मोठा साप!! साप गावात शिरला. भिंतीकडे निघाला. आता दिसत नाही. कुठे गेला साप? मला भिती वाटते...!

**प्रश्न :-**

१) साप कुठे निघाला?

२) सापाची भीती का वाटते?

संदर्भ :- आमच्या गोष्टी - मराठी पावरी

लेखिका :- वर्षा सहस्रबुद्धे

हे माझं गाव. गाव डोंगरावर आहे. इकडे घरं आहेत. तिकडे शेतं आहेत. बाजूला नदी आहे. नदीवर पूल आहे. नदीमध्ये खडक आहेत. नदीचं पाणी झुळझुळ

**प्रश्न :-**

१) गाव कुठे आहे?

२) गावाच्या बाजूला काय आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : दुसरी

---

**कविता**

कवी :- विंदा करंदीकर

एकदा काय झाले, एकदा काय झाले

पक्षी उडून गेले म्हणून झाड उडून गेले

एकदा काय झाले, एकदा काय झाले

गणपतीचा मुकूट घालून उंदीरमामा आले

**प्रश्न :-**

१) कोणत्या ओळी वाचताना तुला हसू आले?

**कोडी**

१) चमचम करतो, आकाशात राहतो,
रोज तुम्हाला उजेड देतो.

२) चकचकीत असतो, गुळगुळीत असतो,
तुम्ही कसे दिसता तुम्हाला दाखवतो.